Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near e-Balbharti, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.नं. ८३२ ए, फा.प्लॉ.नं. १७८,१७९,
ई बालभारती शेजारी आघारकर
रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे भांबुर्डा
शिवाजीनगर पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020) 25651751 Secretary(P) : 25651750 I EPABX -25705000 Fax : 25665807 I
Email : secretary.stateboard@gmail.com

जा.क्र.रा.मं/संशोधन/समकक्षता/३४२३
पुणे – ४११००४
दिनांक – १९/०८/२०२६

प्रती

विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

**विषय** : योग्यता प्रमाणपत्राबाबत सूचना (सुधारित पत्र)

**संदर्भ** : १) क्र. रा.मं./संशोधन /३३३७, दिनांक – २३/०८/२०२४
२) क्र. रा.मं./संशोधन /२९५, दिनांक – २३/०१/२०२५
३) क्र. रा.मं./संशोधन /३३८६ , दिनांक – ०३/१०/२०२५

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सन २०२६-२७ साठी इ. ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र अर्ज ऑनलाईन शुल्कामध्ये तसेच तारखांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. तरी खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे योग्यता प्रमाणपत्र शुल्काचा भरणा करून घेण्यात यावा.

| अनु क्र | विवरण | ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे शुल्क |
|---|---|---|
| १ | भारतीय विद्यार्थी – नियमित शुल्कासह योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्वीकारणे (दि. १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर पर्यंत ) | रु. १०००/- |
| २ | परदेशी विद्यार्थी – नियमित शुल्कासह योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्वीकारणे (दि. १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर पर्यंत ) | रु. १५००/- |
| ३ | भारतीय विद्यार्थी – योग्यता प्रमाणपत्राचे विलंब शुल्क (दि. १ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर पर्यंत ) | रु. १०००+१००=११००/- |
| ४ | परदेशी विद्यार्थी – योग्यता प्रमाणपत्राचे विलंब शुल्क (दि. १ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर पर्यंत ) | रु. १५००+१००=१६००/- |
| ५ | **भारतीय विद्यार्थी** योग्यता प्रमाणपत्राचे अतिविलंब शुल्क दि. १ डिसेंबर पासून योग्यता प्रमाणपत्र अर्ज विभागीय मंडळास सादर करण्यात आलेल्या दिनांकापर्यंत | रु.१०००+१००/- +प्रतिदिन प्रतिविद्यार्थी रु.२०/- |
| ६ | **परदेशी विद्यार्थी** योग्यता प्रमाणपत्राचे अतिविलंब शुल्क दि. १ डिसेंबर पासून योग्यता प्रमाणपत्र अर्ज विभागीय मंडळास सादर करण्यात आलेल्या दिनांकापर्यंत | रु.१५००+१००/- +प्रतिदिन प्रतिविद्यार्थी रु.२०/- |

तसेच CBSE व ICSE बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्राबाबत संदर्भिय क्र. ३ च्या पत्रा अन्वये कळविण्यात आले होते. तरी CBSE व ICSE बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्राबाबत संदर्भिय क्र. ३, क्र. रा.मं./संशोधन /३३८६, दिनांक – ०३/१०/२०२५ रोजीच्या पत्रा नुसार कार्यवाही करण्यात यावी. आपल्या स्तरावर सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालय व संबंधितांना कळविण्यात यावे. कोणताही विद्यार्थी योग्यता प्रमाणपत्र घेण्यापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

(डॉ. दिपक माळी)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४

क्र.कोविमं/उ.मा./12 वी परीक्षा/ 2902
दिनांक - 20/08/2026

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा- सातारा, सांगली, **कोल्हापूर**

**विषय - शैक्षणिक वर्ष 2026-27 करिता विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्राच्या कार्यवाही बाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सन 2026-27 साठी इ.11 वी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र अर्जाबाबत वरील पत्राप्रमाणे उचित कार्यवाही करणेत यावी. तसेच CBSE/ICSE बोर्डाच्या विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्रासाठी संबंधित क.महाविद्यालयाच्या कव्हरिंग लेटर सह (तसेच विद्यार्थी यादी Soft Copy स्वरुपात) विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेची प्रमाणित केलेली छायांकित प्रत तसेच स्थलांतर प्रमाणपत्राची छायाप्रत व निर्धारित शुल्क गतवर्षी प्रमाणे मंडळ कार्यालयास ऑफलाईन पध्दतीने सादर करावे. CBSE/ICSE बोर्डा व्यतिरिक्त इतर बोर्डातील विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्र अर्जाची प्रचलित पध्दतीने ऑनलाईन प्रणालीव्दारे कागदपत्रे अपलोड करुन योग्य ती कार्यवाही करावी. तसेच गतवर्षी म्हणजेच इ. 11 वी ला प्रवेश घेतलेल्या CBSE/ICSE विद्यार्थ्यांना त्यावेळी योग्यता प्रमाणपत्र अर्ज भरला नसेल व इ. 12 वी साठी योग्यता प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केला असेल तर अशा विद्यार्थ्यांना अर्ज सादर केलेल्या दिनांकापर्यंत वरील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे विलंब / अतिविलंब शुल्क आकारण्यात येईल.
टिप - सदरचे परिपत्रक क. महाविद्यालयाच्या सूचना फलकावर प्रदर्शित करुन सर्व संबंधित विद्यार्थी / पालक यांचे निदर्शनास आणून द्यावे.

विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर